कार्यकारी अभियंता (विद्युत) एस-२३ संवर्गातील अधिकाऱ्यांना एस-२५ हा निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन आदेश क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१५९/सेवा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ मे, २०२६.

<u>संदर्भ</u> : १. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेपुर ११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दि.१३.०२.२०२३.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.निपानि-२०२३/प्र.क्र.१३/कार्या.१२, दि.२८.०३.२०२३.

## आदेश

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदीनुसार सन २०२३-२४ या निवडसूची वर्षामधून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यकारी अभियंता (विद्युत) एस-२३ (वेतनश्रेणी रु.६७७००-२०८७००) संवर्गातील अधिकाऱ्याला स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या दिनांकास एस-२५ (वेतनश्रेणी रु.७८८००-२०९२००) हा निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्यात येत आहे.

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक (ज्ये.सूची दि. १४.०२.२०२४) | अधिकाऱ्यांचे नांव व प्रवर्ग | एस-२५ निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्यात आलेला दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | ४ | श्रीमती सुनिता कैलास रावते (इमाव) | ३१.०७.२०२४ |

२. वरील अधिकाऱ्याला एस-२५ (वेतनश्रेणी रु.७८८००-२०९२००) हा निवडश्रेणी वेतनस्तर पुढे नमूद अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे :-

१. मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधीन राहून व रिट पिटीशन स्टॅम्प नं.१०८७६/२०२१ व रिट पिटीशन स्टॅम्प नं.१०८७८/२०२१ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२५.०५.२०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सदर निवडश्रेणी नमूद रिट याचिकेत होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून राहील.

३. वरील अधिकाऱ्याची वेतननिश्चिती ही त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ११ (४) नुसार संबंधित कार्यालयाकडून करण्यात यावी.

४. वरील प्रमाणे अनुज्ञेय व देय ठरणारी वेतन व भत्त्यांच्या थकबाकीची रक्कम, संबंधित अधिकारी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत अथवा ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले असतील, त्या कार्यालयातील वेतन व भत्त्यांची देयके ज्या लेखाशीर्षातून आहरित व संवितरीत करण्यात येतात, त्याच लेखाशीर्षाखालील उपलब्ध अनुदानातून खर्ची टाकण्यात यावी.

५. न्यायालयीन निर्णय / ज्येष्ठतेचे पुनर्विलोकन अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे उपरोक्तप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवडश्रेणीच्या दिनांकात बदल करणे अनिवार्य ठरल्यास व तसे केल्याने संबंधितांना प्रदान करण्यात आलेल्या रकमेचे अतिप्रदान झाल्यास, ती रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीने संबंधितांकडून तसे हमीपत्र भरुन घेतल्यानंतरच, त्यांना देय असणारी थकबाकी रक्कम अदा करण्यात यावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०५२६१२२९४८८२१८ हा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DATTATRAY VASANTRAO KHARKE

Digitally signed by DATTATRAY VASANTRAO KHARKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Works Department, 2.5.4.20=D598800BEB5ED37AE09D78FFF05921827123426EC3977A7476478CE183BE979D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6BAEF55AD6F77A3A40CCCC3E9DD0F50E344AB83A754542299875CF07868ED88B, cn=DATTATRAY VASANTRAO KHARKE
Date: 2026.05.26 12:30:37 +05'30'

**( द. व. खारके )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. उप मुख्यमंत्री, सा.बां.(सा.उ.) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. महालेखापाल -१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
५. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर,
६. अधीक्षक अभियंता (विद्युत) तथा समन्वय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक (विद्युत) मंडळ, मुंबई,
७. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,-------------.
८. श्रीमती सुनिता कैलास रावते, अधीक्षक अभियंता (विद्युत), नागपूर, प्रादेशिक विद्युत मंडळ, नागपूर. ( संबंधित मुख्य अभियंता, कार्यालयामार्फत )
९. मा. मंत्री, सा.बां. (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. मा.राज्यमंत्री, सां.बां. (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. मा.राज्यमंत्री, सां.बां. (सार्वजनिक उपक्रम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. अपर मुख्य सचिव (सा.बां.), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक,
१३. सचिव ( रस्ते / बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक,
१४. सर्व सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. कार्यासन अधिकारी (सेवा-६ / संगणक कक्ष) , सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. निवडनस्ती.